# छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे शेती क्षेत्रातील योगदान

**डॉ. गुरूनाथ इश्राम सामंत,** सहाय्यक प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग न्यू कॉलेज कोल्हापूर

**प्रा. डॉ. बी. टी. वाघमारे,** माजी विभागप्रमुख अर्थशास्त्र विभाग न्यू कॉलेज कोल्हापूर

**गोषवारा :**

छत्रपती राजर्षी शाहू महाराज हे दूरदृष्टीचे शासक होते. समाजातील विविध घटकांच्या सर्वांगिण प्रगती व उन्नतीसाठी त्यांनी विविध प्रभावी निर्णय घेतले होते. ज्या दिवसापासून शाहू महाराजांनी राज्यकारभाराची सुत्रे हातात घेतली तेव्हा पासून 28 वर्षे कोल्हापूर संस्थानात रयतेचे राज्य निर्माण केले. शेती ही पारंपरिक पद्धतीने न करता आधुनिक पद्धतीने केली पाहिजे असे त्यांचे मत होते. शेतकऱ्यांचे पावसाच्या पाण्यावरचे परावलंबित्व दूर करून शेती खात्रीची व्हावी यासाठी राधानगरी तलावाचे काम त्यांनी हाती घेतले. या धरणाच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्रात, कोल्हापूरात हरितक्रांतीची पहिली मुहूर्तमेढ रोवली. शेतकऱ्यांची भरभराट व्हावयाची असेल तर प्रगत शेतीच्या जोडीला सहकारी चळवळीची जोड मिळणे आवश्यक आहे. हे महाराजांनी ओळखले म्हणून त्यांनी 1912 मध्ये संस्थानात सहकारी कायदा मंजूर केला आणि सहकारी चळवळीस प्रेरणा दिली. शाहू महाराजांनी शेती, उद्योगधंदे, व्यापार, सहाकार, पाणीव्यवस्थापन, दुष्काळ निवारण इ. क्षेत्रांना प्राधान्य देऊन महत्त्वपूर्ण कार्य केले. महाराजांनी संस्थानातील शेतकऱ्यांना शेती शिक्षण मिळावे यासाठी शेती शिक्षणाला जास्त महत्त्व दिले. शेतकऱ्यांचा अशिक्षितपणा दूर करण्यासाठी त्यांनी संस्थानात 1917 मध्ये प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. तसेच ग्रामीण भागातील शाळेत शेतीविषयक शिक्षण देण्याची सोय केली. शेती ही पारंपरिक पद्धतीने न करता त्यामध्ये आधुनिकता आणून शेतीतून अधिक उत्पन्न कसे मिळेल याकडे त्यांनी जाणिवपूर्वक लक्ष दिले. महाराजांनी कोल्हापूर संस्थानात चहाचे व कॉफीच्या लागवडीचे प्रयोग केले. शेती प्रदर्शन भरवले आणि शेतीच्या विकासाच्या दृष्टीने पाऊले उचलली. महाराजांच्या दूरदृष्टीमुळे आज कोल्हापूर जिल्हा सुजलाम सुफलाम झाला आहे.

- **प्रस्तावना :**

महाराष्ट्र संताची परंपरा, पुरोगामी विचारांचे राज्य म्हणून ओळखले जाते. सामाजिक सुधारणांचा पाया घालणारे राज्य म्हणून त्याची ख्याती आहे. थोर विचारवंतांची भूमी म्हणून या राज्याकडे पाहिले जाते. उंचउंच सह्याद्रीच्या रांगा, गड–किल्ले, निसर्गरम्य ठिकाण, विविध लेण्या, अशा विविधतेने नटलेले महाराष्ट्र राज्य आहे. छत्रपती शिवाजी महाराज, राष्ट्रपिता जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांने क्रांतीची मशाल आजही महाराष्ट्रात पेटत आहे. स्वातंत्र्यापूर्वी कोल्हापूर संस्थानाचं नाव इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिले गेले आहे. कारण कोल्हापूर संस्थानात राजर्षी शाहू महाराज यांनी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विचारांचा विकास केला आणि जो आज जगभरात पोहचलेला आहे. शाहू महाराजांनी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विचार फक्त मांडले नाहीत तर त्या विचारांचे रूपांतर कृतीत आणले हे त्यांच्या कार्यातून दिसून येते. राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक विचारांमध्ये शेती, उद्योग, सहकार, पायाभूत सोयी–सुविधा, सेवाक्षेत्र, राजस्व सुविधा इत्यादींचा समावेश होतो. या सर्व क्षेत्रात त्यांनी कृतीद्वारे लक्षणीय विकास कोल्हापूर संस्थानात घडवून आणला. सन 1894 ते 1922 अशी 28 वर्षे त्यांनी कोल्हापूर संस्थानाचा राज्यकारभार केला. या कालावधीत त्यांनी भविष्यातील 100 पेक्षा जास्त वर्षाचा अंदाज घेऊन संस्थानच्या आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक अशा सर्व क्षेत्रांमध्ये सर्वांगीण विकासाची व्युहरचना आखली आणि ती यशस्वी सुद्धा केली.

प्रस्तुत लेखामध्ये राजर्षी शाहू महाराजांनी 1894 या वर्षापासून राज्यकारभाराची सुत्रे हातात घेतल्यानंतर संस्थानात शेती क्षेत्राचा विकास कसा घडवून आणला आहे याचा अभ्यास करण्याचा अल्पसा प्रयत्न करण्यात आला आहे.

- **उद्दिष्ट्ये :**

1. कोल्हापूर संस्थानातील शाहू महाराजांनी केलेल्या शेती विकासाचा अभ्यास करणे.
2. कोल्हापूर संस्थानातील तत्कालीन राबविलेल्या शेती धोरणांची माहिती घेणे.
3. राजर्षी शाहू महाराजांचा शेती विषयक, विकासात्मक दृष्टीकोन अभ्यासणे.

- **संशोधन पद्धती :**

राजर्षी शाहू महाराजांचे कार्य व्यापक असल्यामुळे फक्त महाराजांच्या शेतीविषयक विचारावर प्रस्तूत शोध निबंधाच्या माध्यमातून प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये प्रकाशित, अप्रकाशित लेख, मासिके, विविध पुस्तके, ग्रंथ आणि इंटरनेट इत्यादीचा वापर केलेला आहे.

छत्रपती शाहू महाराजांना आर्थिक विकासाबद्दल प्रचंड ओढ होती. त्यामुळे त्यांची सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक धोरणे ठळक स्वरुपाची होती. त्याचप्रमाणे त्यांच्या प्रत्येक विचारात कृती होती. त्यांचे आर्थिक धोरण प्रामुख्याने दोन तत्वावर अवलंबून होते. 1) समाजाधिष्ठित समाजरचना 2) समतोल आर्थिक विकास ही तत्वे सार्वजनिक धोरणांशी मिळतेजुळते होती. या तत्वामध्ये शिस्त, न्याय आणि क्षमता ही मूलभूत कल्पना होती. शाहू महाराजांनी शेती, उद्योगधंदे, व्यापार, सहकार, पाणी व्यवस्थापन, दुष्काळ निवारण इ. क्षेत्रांना प्राधान्यक्रम देऊन महत्वपूर्ण कार्य केले. शाहू महाराजांनी रयतेचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी आर्थिक, प्रशासकीय बाबातीत सत्ताधीश म्हणून हस्तक्षेप धोरणांचा अवलंब केला.

आज महाराष्ट्रात कोल्हापूर जिल्हा हा सुजलाम सुफलाम आहे. शेती, उद्योगधंदे, सहकार, आणि जलसिंचन या क्षेत्रात अग्रक्रमाकांवर आहे तथापि या प्रगतीचा प्रारंभ स्वातंत्र्योत्तर काळात नाही तर स्वातंत्र्यपूर्व काळात शाहू महाराजांच्या कारकीर्दीत या प्रगतीची

पायाभरणी झाली होती. त्याच काळात कोल्हापूर संस्थानात सुरू झालेली हरितक्रांती ही महाराष्ट्रातील पहिली हरित क्रांती होती. त्या क्रांतीचे जनकत्व महाराजांच्या दूरदृष्टीकडे व कल्याणकारी पुरोगामी धोरणाकडे जाते.

भारतासारख्या शेतीप्रधान अर्थव्यवस्थेत शेती, शेतीचा विकास, शेतीचे आधुनिकीकरण हा विषय अत्यंत महत्वाचा ठरतो. प्राचीन व मध्ययुगीन काळातही शेती हेच भारतीयांच्या उदरनिर्वाहाचे व व्यापाराचे साधन होते. इंग्रजांच्या राजवटीत शेती सुधारणेकडे लक्ष दिले गेले नाही. भारतात शेती ही पारंपरिक पद्धतीनुसार केली जात होती. आणि तो पावसाच्या लहरीप्रमाणावर अवलंबून होती. भारतीय शेती ही कच्चा मालाची बाजारपेठ म्हणून ब्रिटिशांनी भारताची ओळख जगभरात केली होती. कोल्हापूर संस्थानामध्ये महाराजांनी अधिकाराची सुत्रे हाती घेतल्यापासून ते कारकीर्दीच्या शेवटपर्यंत त्यांनी शेतीमध्ये विविध प्रकारच्या सुधारणा केल्या. शेतीचा विकास व्हावा म्हणून सर्व उपाय त्यांनी केले.

- **शेतीविषयक दृष्टीकोन** :

राजर्षी शाहू महाराजांच्या काळात क्षत्रिय असणारी आणि स्वतः क्षेत्रीय म्हणून घेणारे लोक शेती व्यवसाय खालच्या दर्जाचा व्यवसाय मानत शेती करणे हे कमीपणाचे मानीत होते हे लक्षात घेऊन शाहू महाराजांनी क्षत्रिय परिषदेला उद्देशून भाषण करताना म्हणाले, ''कृषिकर्मापासून दुहेरी उन्नती होते. स्वतःला सुखी होऊन सर्व मनुष्य जातीलाही सुख प्राप्त होते. कृषिकर्म करताना क्षात्रधर्माला बाधा येते असे नाही. ज्यावर मनुष्य समाजाची सुव्यवस्था व उन्नती अवलंबून आहे. ते कर्म करणारे नीच आहेत, शुद्र आहेत हे म्हणणे मुळीच पटत नाही.'' या विचारातून महाराजांची श्रमाची प्रतिष्ठा आणि शेती विषयक दृष्टीकोन स्पष्ट होतो.

- **शेती आणि शिक्षण** :

शेतकऱ्यांचे अज्ञान दूर करण्यासाठी त्यांच्यामध्ये शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे केवळ सार्वजनिक सर्वसामान्य शिक्षण देणे योग्य ठरणार नाही. शेती विषयक विशेष करून या दोन्हीही पद्धतीच्या शिक्षणाकडे महाराजांनी लक्ष दिले. शेतकऱ्यांचा अशिक्षितपणा दूर करण्यासाठी त्यांनी कोल्हापूर संस्थानात 1917 मध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. याशिवाय ग्रामीण भागातील शाळेत त्यांना शेतीविषयक शिक्षण देण्याची सोय केली. कोल्हापूर संस्थानात सक्तीचे व मोफत शिक्षण सुरू करण्यापूर्वी 1896 साली महाराजांनी राजाराम हायस्कूलमध्ये शेती हा नवीन विषय सुरू केला. जेणेकरून लहान वयातच शेतीची गोडी लागावी. शेतीच्या विकासाला आधुनिक स्वरूप यावे, त्यामध्ये आधुनिकता येण्याची गरज आहे हे ओळखून महाराजांनी 1906 मध्ये पी.सी. पाटील या मुलास पुणे येथील ॲग्रीकल्चर कॉलेजमध्ये शेती विषयाचे शिक्षण घेण्यासाठी पाठवले होते. शेती शिक्षणाची सुरूवात महाराजांनी आपल्या घरातूनच केली होती. त्यांनी आपल्या युवराजांना म्हणजेच राजाराम महाराजांना इंग्लंड मधील शिक्षणात शेती विषय घेण्यास लावले होते. संस्थानातील जनतेला शेती शिक्षणाच्या सुधारित पद्धतीची माहिती करून देण्यासाठी महाराजांनी 1912 मध्ये 'दि किंग एडवर्ड ॲग्रीकल्चर इन्स्टिट्यूट'ची स्थापना कोल्हापूरात केली. सुधारीत शेती पद्धतीचा प्रसार करणे व शेतकऱ्यांच्यामध्ये ती लोकप्रिय करणे हा या संस्थेचा उद्देश होता. सन 1913 मध्ये 'शेती सुधारणा' या पुस्तकाच्या 100 प्रती संस्थानातील शाळेच्या ग्रंथालयामध्ये दिल्या तसेच परदेशात शेती शिक्षण घेणाऱ्या संस्थानातील विद्यार्थ्यांना महाराजांनी आर्थिक मदतीबरोबरच बिनव्याजी कर्जपुरवठा सुद्धा केला होता.

- **कर्जपुरवठा** :

भारतीय शेतकरी भांडवलाच्या अभावामुळे आपली प्रगती करू शकत नाही, अधिक उत्पादन घेऊ शकत नाही आणि तो मागासलेला आहे याची जाणीव महाराजांना होती. महाराजांनी शेतकऱ्यांची ही अवस्था पाहून भांडवलाची कमतरता दूर करण्यासाठी संस्थानात योग्य धोरणांची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली.

संस्थानात महाराजांनी शेतकऱ्यांना तगाईच्यामाध्यमातून कर्जे दिली होती. शेतीच्या विकासासाठी शेतकऱ्यांना अत्यल्प व्याजदराने तर काही शेतकऱ्यांना व्याजविरहित कर्जे देण्यात आलेली होती. सावकारांकडून होणारी शेतकऱ्यांची पिळवणूक थांबविण्यासाठी त्यांनी संस्था स्थापन केल्या. आणि त्या मार्फत शेतकऱ्यांना अल्पव्याजदराने कर्जपुरवठा करण्यास सुरूवात केली होती. संस्थानातील शेतकऱ्यांच्या जमिनी सावकारांच्या ताब्यात होत्या. महाराजांना त्या जमिनी शेतकऱ्यांच्या नावाने करून देण्याचा मानस होता. म्हणून 1895 मध्ये कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी काही अटी घालून कर्ज देण्यास सुरूवात केली. व्हिक्टोरिया राणीच्या निधनानंतर गरीब व कर्जबाजारी शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी 1904 साली 'व्हिक्टोरिया मेमोरिअल फंड' ची स्थापना केली, या फंडामार्फत शेतकऱ्यांना जमिनी ताब्यात घेण्यासाठी कर्ज देण्यात आली.

दृष्काळाच्या वेळी शेतीला कर्ज देण्याकडे महाराजांनी विशेष करून लक्ष दिले. 1897–98 च्या अहवालावरून असे समजून येते की, जवळजवळ 36,201 रूपये तगाई स्वरूपात जनतेमध्ये वाटले गेले. 1906–07 च्या अहवालात अशी नोंद आहे की, 12,500 रू तगाई म्हणून दिले. त्याशिवाय संस्थानाच्या ट्रेझरी मध्ये जे वेगवेगळे निधी ठेवण्यात आलेले होते. त्यामधून रू 26,768 कर्जाऊ म्हणून दिले होते.

- **जमिनीच्या तुकडीकरणाला विरोध** :परंपरागत पद्धतीने शेती करण्यावर महाराजांचा फारसा भर नव्हता. शेती ज्या पद्धतीने पाश्चात्य देशात केली जाते त्या पद्धतीने आपल्याकडे करता येईल का? या दिशेने त्यांच्या विचारांची वाटचाल होती. शेतीमध्ये वेगवेगळ्याा प्रकाराच्या सुधारणांची अमंलबजावणी झाली पाहिजे, तसेच शेतीचे आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे असे त्यांचे मत होते. यासाठी जमिनीचा आकार किमान वाजवी असणे आवश्यक आहे. संस्थानात त्यावेळी सर्वसाधारण शेतीचा आकार हा वाजवीपेक्षा लहान होता. त्यामुळे शेतकऱ्यांना योग्य प्रकारे काटकसरीने शेतीकरता येत नव्हती. शेतीपासून अधिक प्रमाणात उत्पन्न मिळत नव्हते परंतू शेतकऱ्याजवळ असणाऱ्या शेतीचा आकार मोठा असणे आवश्यक आहे असे त्यांचे ठाम मत होते. यासंदर्भात 22 मार्च 1920 मध्ये माणगाव परिषदेत आपल्या भाषणातून प्रखड मत मांडले. ते पुढीलप्रमाणे, ''मी सर्व बलुतेदारास व महार वगैरे वतनदारास अशी विनंती करतो की, अशी लहान–लहान वतने व बलुती यांच्यामागे तुम्ही लागू नका ती सोडून द्या व विशेषकरून महार लोकांना मी अशी विनंती केली की, तुम्ही साधारण माणशी 10 एकर जमीन

वाट्याला येईल असे तुमच्या महारकीचे तुकडे करा व हे उत्पन्न तुमच्यातील जे वडील असतील त्यांच्याकडे जसे पाटील, सनदी, शिलेदार यांच्याकडे चालते तसे चालवा...बाकीच्या महार लोकांस गावात अगर बाहेरगावी कोणताही धंदा करण्यास मोकळीक होईल आणि सर्वांनीच जे अर्धपोटी राहावयाचे तेही वाचेल.'' असे ठाम मत या परिषदेत मांडले. अश तऱ्हेने महाराजांनी कायदा व समाजजागृती करून जमिनीच्या विभागीकरणाला विरोध करून कोल्हापूर संस्थानात लागवडीयोग्य जमिनीचे आकारमान वाढविल्याचे दिसून येते.

- **शेतीचे आधुनिकीकरणः**

राजर्षी शाहू महाराजांनी सन 1894 मध्ये राज्यकारभराची सुत्रे स्वीकारली. त्यांनी सर्व प्रथम आपल्या संस्थानाची पाहणी केली. ही पाहणी करण्यामागे प्रजेची आर्थिक परिस्थिती समजावून घेणे हा हेतू होता. पाहणीमध्ये त्यांना असे दिसून आले की, संस्थानाच्या ग्रामीण भागात पाण्याच्या अभावामुळे शेतीची दयनीय अवस्था झाली. संस्थानातील बराचसा भाग/प्रदेश मुळातच डोंगराळ व निःसत्व असल्यामुळे लोकांची परिस्थिती अत्यंत दयनीय स्वरूपाची झाली होती. लोकांना जमिनीपासून उदरनिर्वाहापुरते उत्पन्न मिळत नव्हते. त्यामुळे त्या त्या भगातील संस्थानाची जी जंगले होती त्यामध्ये अतिक्रमण करून लोक झाडे तोडित. कारण त्यांच्या जमिनी सावकारांच्या ताब्यात होत्या त्यामुळे त्यांना शेतीचा विकास करता येते नव्हता.

शेतीमध्ये नवीन लागवडीचे प्रयोग त्यांनी संस्थानातर्फे केले. विशेषकरून त्यामध्ये स्वतः जातीने लक्ष घातले. कॉफीला चांगला भाव येत असल्याने दक्षिण भारतातील कॉफीची लागवड फायदेशीर होत होती. असे महाराजांना दिसून आले म्हणून त्यांनी दक्षिण हिंदूस्थानातील ज्या भागात कॉफीची लागवड होत होती. तेथील भौगोलिक परिस्थितीची पाहणी केली. हवामानाची पाहणी केली. तेथे काम करणाऱ्या अनेक युरोपियन व हिंदी तज्ज्ञांचा सल्ला घेतला. दक्षिण हिंदूस्थानात जेवढे हवामान अनुकूल आहे तेवढे कोल्हापूर संस्थानामध्ये नाही. वर्षभर पाऊस पडत नाही तरीही महाराजांनी कॉफी लागवडीचे प्रयोग करायचे ठरविले. घाटवळ भागातील जमिनी पडीक ठेवण्यापेक्षा त्यामध्ये काही तरी पीक घेऊन उत्पन्न काढता यावे व तेथील डोंगराळ भागातील लोकांना रोजगार मिळावा यासाठी त्यांनी पन्हाळा पेटयातील पेढखले या गावी कॉफी लागवड केली. यानंतर त्यांनी भुदरगड पेटयातही कॉफी लागवडीचे प्रयोग केले.

कॉफीप्रमाणेच चहाच्या लागवडीकडेही महाराजांनी जातीने लक्ष दिले. चहाची लागवड सुरूवातीला पन्हाळ्यालाच केली. हा प्रयोग करताना ग्रामीण भागातील लोकांना रोजगार मिळावा हीच त्यांची अपेक्षा होती. चहाच्या लागवडीचा प्रयोग तुरूकवाडी येथे केला. कोरफडीची लागवड मोठ्या प्रमाणावर करण्यात आली. महाराजांनी राळ तयार करण्याचे प्रयत्न केले. राळ तयार करण्यासाठी गंजन नावाचे गवत लागते ते संस्थानात मोठ्या प्रमाणावर येत होते. त्यामुळे उत्पन्न मिळावे, रोजगार मिळावा म्हणून महाराजांनी हाही प्रयोग करून बघितला. त्याचप्रमाणे पन्हाळा व भुदरगड या भागात वेलदोडे, कोको इंडियन व इतर प्रकारचे रबर, ताग, अंबाडी, बेळगावी बटाटे, लाख, शिंगाडे, टॅपिओका आणि शिरोळ तालुक्यात कंबोडियन कापूस इत्यादींची लागवडीचे प्रयोग त्यांनी केले. हिरडा, जांभूळ, ताग, कापूस, साग, आंबा, फणस, इत्यादीच्या लागवडीचे प्रयोग केले. तसेच निलगिरीहून औषधी वनस्पती, बंगलोरहून रबर व कोको, ब्ऱ्हाणपूरच्या बॉटनिकल गार्डन मधून मूल्यवान प्रतीचे लाकूड कांग्रा व्हॅलीमधून मोठ्या प्रमाणावर चहाचे बी व निलगिरीहून चहाचे बी आणून बोरगाव व बालिंग्याजवळ लागवडी केल्या होत्या. यावरून महाराजांच्या शेतीच्या आधुनिकीकरण संदर्भातील दृष्टीकोन व प्रयोगशील कृतीचे दर्शन घडते.

- **शेती प्रदर्शन** :

शेतीला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने महाराजांनी आणखी एक उपाय योजला होता तो म्हणजे शेतीविषयक प्रदर्शन होय. महाराजांनी 6 फेब्रुवारी 1896 रोजी चिंचली या ठिकाणी पहिले शेती व जनावरांचे प्रदर्शन भरविले. शेतीसाठी मोठ्या प्रमाणावर प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. प्रदर्शनाच्या निमित्त्याने लोक त्याकडे आकर्षिले जातील. लोकांना केवळ करमणूकच होणार नाही तर प्रदर्शनाला भेट दिल्यानंतर शेतकऱ्यांना शिकण्याजोग्याही काही गोष्टी तेथे असतील असा हा दुहेरी हेतू शाहू महाराजांचा शेती प्रदर्शन भरवण्यामागे होता. या शेती प्रदर्शनातून नवीन गोष्टी आत्मसात करून काही शेतकरी त्याचा प्रयोगही स्वतःच्या शेतावर करायला प्रवृत्त होतील अशी त्यांची अपेक्षा होती. कोल्हापूर संस्थानातील जैन परिषदने नोव्हेंबर 1909 मध्ये एक शेतीविषयक प्रदर्शन भरविले होते. शेतीविषयक अवजारे, शिवणकाम, विणकाम, भरतकाम, लेसचे नमुने इत्यादी. प्रदर्शनात ठेवण्यात आले होते. मोठ्या प्रमाणावरील पहिले शेतीविषयक प्रदर्शन एप्रिल 1814 मध्ये भरले होते. उद्घाटनप्रसंगी छत्रपतींनी मोठ्या अभिमानाने सांगितले, ''माझ्या प्रदेशात अशा तऱ्हेचे हे पहिलेच मोठे प्रदर्शन भरत आहे. त्या प्रदर्शनाचा शेतकरी वर्गावर व त्याच्या कृषिकर्म पद्धतीवर चांगला परिणाम घडून येईल अशी मला आशा आहे.

प्रदर्शनाचे तीन विभाग करण्यात आले होते. पहिला विभाग होता जनावरांचा, दुसरा विभाग शेतीविषयक अवजारांचा आणि तिसरा विभाग कला व औद्योगिक वस्तू इ. चा समावेश होता. प्रदर्शनामध्ये सुधारित शेती पद्धती, खते तयार करण्याच्या वेगवेगळ्या पद्धतीवर व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. अशा प्रकारे महाराजांनी शेती शिक्षणाला मदत करण्यासाठी जनावरांची जोपासना कशी करावी हे समजून घेण्यासाठी, शेतकऱ्यांना आधुनिक खते, अवजारे, बि–बियाणे इत्यादींची माहिती करून देण्यासाठी तसेच संस्थानाचा शेती विकास घडवून आणण्यासाठी संस्थानात शेती प्रदर्शनाचे यशस्वी आयोजन केले होते. आज जगभरात मोठ्या प्रमाणात शेती विषयक व जनावरांविषयक प्रदर्शन भरविली जात आहेत. प्रदर्शनात वेगवेगळी शेतीविषयक व्याख्याने, अवजारांचे प्रदर्शन भरविली जात आहेत. याची सुरूवात महाराजांनी 100 वर्षापूर्वीच केली होती हे विसरता कामा नये.

- **जोड व्यवसाय** :

शेतीबरोबरच शेतीच्या जोड व्यवसायाकडेही महाराजांचे जाणीवपूर्वक लक्ष होते. शेती हा हंगामी व्यवसाय असल्याने बारा महिने उत्पन्न मिळवण्यासाठी काही शेतीला पूरक व्यवसाय करणे आवश्यक आहे असे त्यांचे मत होते. शेती आधारित जोड व्यवसायांचा विकास

करणे गरजेचे होते म्हणून महाराजांनी शेतकऱ्यांना दुय्यम धंदे मिळावेत यासाठी संस्थानातील शेतकऱ्यांना बांधावर घायपात लावून त्यापासून दोर तयार करण्यास प्रोत्साहन दिले. याबरोबरच मेंढी–शेळी पालन, कुक्कूट पालन, रेशीम उद्योग, दुग्धव्यवसाय, इत्यादी व्यवसायांना उत्तेजन दिले. ज्यामुळे शेतकरी व शेतमजूर यांच्यामध्ये निर्माण होणारी हंगामी स्वरूपाची बेकारी नाहीशी होऊन 12 महिने रोजगार प्राप्त होणे शक्य झाले. आज महाराष्ट्रात नव्हे तर देशात शेतीच्या अनेक जोड व्यवसायांचा शासनाच्या योजना उपलब्ध आहेत.

शासनामार्फत शेतकऱ्यांना अनुदानाच्या स्वरूपात शेतीला जोडण्याच्या विविध योजना उपलब्ध करून दिल्या आहेत. यावरून महाराजांच्या धोरणाची शासनाकडून अमंलबजावणी केली असे म्हणता येईल.

- **राधानगरी धरण** :

शेती उत्पादन वाढवण्यासाठी शेतीला पाण्याची आवश्यकता आहे. दुष्काळात छोट्या–मोठ्या तलावाची बांधणी करणे, जुने तलाव दुरूस्त करणे, नवीन तलाव बांधणे, कच्चा–पक्या विहीरी तयार करणे इत्यादी लहान सुधारणा तर महाराजांनी केल्या. परंतू त्यासाठी एक दीर्घकालीन योजनाही त्यांनी कार्यवाहित आणली. ही योजना म्हणजे राधानगरी धरण होय.

सन 1902 च्या युरोपच्या दौऱ्यात शाहू महाराजांनी तेथील देशस्थितीचे व सत्तास्थितीचे सूक्ष्म निरिक्षण केले होते. युरोपातील लोकांनी निसर्गातील साधन संपत्तीचा प्रत्येक स्त्रोत मोठ्या कल्पकतेने आपल्या भौतिक प्रगतीसाठी वापरल्याचे पाहून ते प्रभावित झाले होते. आपल्याकडे असे का होऊ नये? आपण त्यांचे अनुकरण का करूनये असे विचार त्यांच्या मनात थैमान घालत होते. नैसर्गिक साधन संपत्तीचा आपणाकडून चांगल्या पद्धतीने वापर होत नाही. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीचे अभ्यासपूर्वक सूक्ष्म पद्धतीने निरिक्षण केले तसेच नैसर्गिक साधन संपत्तीचा उपयोग आपल्याकडे का करता येऊ नये? हा प्रश्न त्यांच्या मनात घोळत होता. आपल्याकडे डोंगराळ भागात पाऊस भरपूर पडतो पण त्याचा देशावरच्या जमिनीला काही उपयोग होत नाही यासाठी वाहून जाणाऱ्या पाण्याला बांध घालून ते साठवून ठेवले पाहिजे अशी योजना पक्की झाल्यावर त्यांनी एप्रिल 1907 मध्ये तज्ज्ञ व्यक्तीकडून जागेची पाहणी केली. 1909 साली प्रत्यक्ष धरणाचे कामकाज सुरू झाले. दुर्दैवाने महाराजांच्या हयातीत ही योजना पूर्ण होऊ शकली नाही. परंतू या राधानगरी धरणामुळे महाराजांनी कोल्हापूरातील हरितक्रांतीचा पाया घातला असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. पुढे हे धरण 1957 साली महाराजांचे सुपुत्र छत्रपती राजाराम महाराजांनी पूर्ण केले आणि शाहू महाराजांचे स्वप्न पूर्ण केले.

आज हे धरण कोल्हापूरातील प्रमुख धरण म्हणून ओळख्ले जाते. या धरणामुळे कोल्हापूरातील शेतकऱ्यांचे कल्याणात वाढ झाली. तसेच शेतकरी आपल्या शेतीतून बारमाही पिके घेऊ लागला. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊ लागली त्यांची आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाली. राधानगरी धरणाच्या योजनेच्या धर्तीवर स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर भारतात अनेक मोठी धरणे बांधण्यात आली. त्याचा पाया छत्रपती शाहू महाराजांनी घातला आहे हे विसरता येणार नाही.

- **समारोप** :

कोल्हापूर संस्थानात 1894 ते 1922 या कालखंडात छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी रयतेच्या कल्याणासाठी महत्वपूर्ण कार्य केली. आपली रयत सुखी समाधानाने राहावी हा त्यांच्या कार्या मागचा हेतू होता. आजच्या सत्ताधीशांना लाजवेल अशी कार्ये महाराजांनी 100 वर्षापूर्वी केली आहेत. शेती करणे हे शुद्र कर्म नाही तर शेती केल्याने आपली प्रगती होते हे त्यांनी शेतीविषयक दृष्टीकोनातून मत व्यक्त केले. शेतकऱ्यांना शेतीचे शिक्षण दिले जेणे करून त्यांनी शेतीमध्ये आधुनिकता आणावी. संस्थानात शेतीचे प्रदर्शन भरविली, विविध व्याख्यानात शेतीच्या मशागतीचे धडे शेतकऱ्यांना देण्यात आले. राधानगरी धरणामुळे कोल्हापूरात हरितक्रांती झाली. आज या राधानगरी धरणासारखी संपूर्ण भारतात अशी धरणे दिसून येतात. महाराजांनी शेती क्षेत्रात जे विचार मांडले त्याची कोणीही तुलना करू शकणार नाही त्यांच्या विचारांच्या माध्यमातून त्यांनी शेतकऱ्यांचे अज्ञान दूर केले आहे. शेतकऱ्यांच्यात नवचेतना निर्माण केली. आधुनिक शेतीचे शिक्षण दिले. शेतकऱ्यांच्या वस्तूला चांगला दर मिळावा यासाठी त्यांनी शेतकऱ्यांना हक्काची बाजारपेठ निर्माण करून दिली. राजर्षी शाहू महाराज हे बोलके नव्हते तर ते कर्ते सुधारक होते हे त्यांच्या विचारातून आणि कृतीतून दिसून येते.

**संदर्भः**

01. राजर्षी शाहू गौरव ग्रंथ – संपादक प्रा. डॉ. रमेश जाधव, तिसरी आवृत्ती 2016 महाराष्ट्र शासन
02. राजर्षी शाहू महाराज स्मारक ग्रंथ–जयसिंगराव पवार 2001
03. लोकराज्य, सप्टेंबर 2018 अंक 3 माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन
04. कुंभार नागोजीराव : ''राजर्षी शाहू महाराज'' प्रबोधन प्रकाशन, लातूर 1992
05. म्होपरे राहूल : इकॉनॉमिकल पॉलिसी ॲण्ड प्रोग्रामस ऑफ राजर्षी शाहू महाराज, पीएच.डी प्रबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर 2006
06. राजर्षी शाहू छत्रपती– एक सामाजक्रांतीकारक राजा धनंजय कीर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 1979
07. श्री. शाहू छत्रपतींचे अर्थकारण प्रा. मीना कुलकर्णी आणि ब. शि. कुलकर्णी, गौरीनंद पब्लिकेशन, कोल्हापूर, 1975.